## नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१७८/२०१५ मधील

## निशाणी क्र.८५ वर आदेश

**CNR-MHLA110007822018**

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ खालील तरतुदीनुसार कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, सदर प्रतिवादींनी दाखल केलेल्या कैफियतीमध्ये परिच्छेद क्र.७ नंतर अर्जात नमूद केलेला मजकूर नमूद करण्याचे नजरचुकिने राहुन गेलेले आहे. सदर मजकूर हा शेवंताबाईच्या वारसाच्या अनुषंगाने आहे. त्याअनुषंगाने कैफियतीमध्ये अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जात नमूद केल्याप्रमाणे कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याची प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी शेवटी मागणी केलेली आहे.

२. सदर अर्जाला वादीने म्हणणे दाखल करुन तीव्र विरोध दर्शविला आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, अर्जातील मागणी योग्य व कायदेशीर नाही. प्रकरण लांबविण्याच्या उद्देशाने वादीचा पुरावा दाखल केल्यानंतर प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्ज चालु शकत नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्यातील मूळ स्वरूपामध्ये बदल होणार आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची वादीने शेवटी मागणी केलेली आहे.

३. सदर अर्जामधील व म्हणण्यामधील कथन विचारात घेवून सदरचा अर्ज निकाली काढण्याकरिता मी खालील मुद्दे विचारात घेतले आहेत. सदर मुद्दयांना कारणासहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जात नमुद प्रस्तावित दुरुस्ती ही पक्षकारांमधील वादाचे निराकरण करण्यासाठी आवश्यक आहे का ? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## **का र ण मी मां सा**

४. सदर प्रकरणातील पक्षकारांतर्फे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

**मुद्दा क्र. १ करिता –**

५. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरुन याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदरचा दावा वादीने मिळकतीच्या वाटपाकरिता दाखल केलेला आहे. सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी कैफियत दाखल करुन दाव्यातील मागणी स्पष्टपणे नाकारलेली आहे. तसेच सदर प्रकरणामध्ये नि.क्र.५३ ला मुद्दे काढण्यात आलेले असून प्रकरणातील वादीचा पुरावा संपलेला असुन प्रकरण प्रतिवादींच्या पुराव्याकरिता प्रलंबित असताना प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात

आलेला आहे. सदर प्रकरणातील पक्षकारांमधील वादाचे स्वरुप व प्रकरणाची स्टेज विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदर प्रकरण अंशतः सुनावणीकरिता प्रलंबित आहे. तसेच प्रकरण सन २०१५ पासुन प्रलंबित आहे.

६. सदरचा दावा वादीने मिळकतीच्या वाटपाकरिता दाखल केलेला असल्यामुळे वारसांबाबत बचाव मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. सदर अर्जामुळे प्रकरण निकाली निघण्यास आणखी विलंब होणार आहे. सदरचा विलंब खर्चाच्या स्वरुपात भरुन काढुन पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करण्यासाठी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायोचीत होणार आहे. त्यामुळे पक्षकारांमधील वादाचे स्वरुप, प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप व नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, अर्जात नमूद प्रस्तावित दुरुस्ती ही कैफियतीमध्ये नमूद असणे आवश्यक आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ला होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ करिता –**

७. वर नमुद चर्चेवरुन स्पष्ट होते की, सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ वर खर्च बसवुन मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. नि.क्र.८५ वरील अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ वर रक्कम

रु.७००/– खर्च बसवुन मंजूर करण्यात येत आहे.

२. वर नमुद खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी पुढील तारखेपर्यंत वादीला द्यावे अथवा न्यायालयात जमा करावेत.

३. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे मूळ कैफियतीमध्ये दुरूस्ती करुन दुरुस्त कैफियतीची प्रत पुढील तारखेपर्यंत प्रकरणात दाखल करावी.

स्वा/–
(शि. म. गौरगोंड)
दि. ०६.०३.२०१९. सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
निलंगा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : M.N. Yenge |
| Name of the Court | : Jt. C.J.S.D Court (Shivkant M. Gourgond) |
| Date of Judgment/Order | : 06.03.2019 |
| Judgment/Order signed by presiding officer | : 06.03.2019 |
| Judgment/Order uploaded on | : 07.03.2019 |